# कुलगुरूंसाठी ‘अष्टप्रधान मंडळ’

## प्रस्तावित विद्यापीठ कायद्यात तरतूद

sourabh.sharma1
@timesgroup.com

विद्यापीठांचा वाढता पसारा, उद्योगजगताशी सातत्याने येणार संपर्क आदी गोष्टी लक्षात घेऊन विद्यापीठांचा कारभार अधिक नेटकेपणाने आणि कुशलतेने चालवणे शक्य व्हावे यासाठी प्रस्तावित विद्यापीठ कायद्याच्या मसुद्यात कुलगुरूंसाठी आठ सदस्यीय समितीचा समावेश करण्यात आला आहे.

कुलगुरूंचा कामाचा व्याप वाढत असून त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, मनुष्यबळ व्यवस्थापन, उद्योग, मानव्यविद्या आदी क्षेत्रांचे अद्ययावत ज्ञान असणे अशक्य आहे. या क्षेत्राविषयी कुलगुरूंना वेळोवळी सल्ला देण्यासाठी त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची वैधानिक सल्लागार समिती (सॅक) नेमावी, अशी सूचना डॉ. अरुण निगवेकर समितीने केली होती. त्यानुसार नवीन विद्यापीठ कायद्यात ‘अष्टप्रधान मंडळा’चा समावेश करण्यात आला आहे.

या समितीचा कार्यकाळ कुलगुरूंच्या कार्यकाळाएवढाच असेल. या क्षेत्रांमध्ये जागतिक पातळीवर होणारे बदल, त्याची विद्यापीठाच्या अभ्यासक्रम आणि उपक्रमाशी सांगड घालण्यासाठी दुवा म्हणून ही समिती काम करेल, अशी या समितीची भूमिका आखून देण्यात आली आहे.

राज्य सरकार विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात नवीन विद्यापीठ कायद्यास मान्यता घेण्याचा प्रयत्न करणार आहे. सन २०११मध्ये नेमण्यात आलेल्या निगवेकर समितीच्या सूचनांनुसार हे विधेयक तयार करण्यात आले असून, त्यास अंतिम स्वरूप देण्याचे काम सध्या उच्च आणि तंत्रशिक्षणात विभागात सुरू आहे. नवीन कायद्याच्या मसुद्यावर सध्या शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांकडून हरकती आणि सूचना नोंदवण्याचे काम सुरू आहे. त्याकरिता राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये चर्चासत्र आणि बैठकांचे आयोजनही करण्यात येत आहे.

### दोन अभ्यास मंडळे



अष्टप्रधान मंडळाच्याप्रमाणेच, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम ठरवण्यासाठी स्वतंत्र अभ्यास मंडळे असावीत, तसेच परीक्षा घेण्यासाठीही स्वतंत्र मंडळे असावीत, असा बदलही कायद्यात प्रस्तावित आहे. विद्यापीठांशी निगडित निवडणुकांच्या प्रक्रियेतही बदल सुचवण्यात आले असून, त्यांचे सूतोवाच करण्यास तुर्तास शिक्षण विभागाचे अधिकारी तयार नाहीत.

### सिनेटचे ‘सोल’मध्ये रूपांतर

सध्याच्या सिनेटचे रूपांतर सोसायटी पार्टनरशिप कौन्सिलमध्ये (सोल) केले जाणार असून कुलपती, म्हणजेच राज्यपाल हे त्याचे प्रमुख असतील. त्याची बैठक वर्षातून एकदाच, केवळ मार्च महिन्यात होईल. आवश्यकता वाटल्यास त्याची आणखी एक बैठक आयोजित करण्याची मुभा नवीन विद्यापीठ कायद्याच्या मसुद्यात आहे.

कॉलेजांत रामनाम आणि गीतापठण!
FRONT PAGE 2
पहा पान १६

म.टा. दि०११-०९-१५